# प्रकरण १

# विषयाची संकल्पना

- १.१ प्रस्तावना
- १.२ विषय निवड
- १.३ समस्या कथन
- १.४ प्रस्तुत विषयाचे महत्त्व
- १.५ व्याप्ती आणि मर्यादा

प्रकरण पहिले

# विषयाची संकल्पना

## १.१ प्रस्तावना

मराठी संगीत नाटके आणि त्यातील नाट्यसंगीत हा महाराष्ट्राचा सांस्कृतिक वारसा १८८० पासून चालत आला आहे. लावणी, पोवाडा, अभंग, गवळण, भारूड तसेच ख्याल इ. गीतप्रकार निरनिराळ्या काळांमध्ये महाराष्ट्राच्या संगीताचे व संस्कृतीचे अंग बनलेले आहेत. मराठी नाट्यसंगीतही महाराष्ट्राची लोकप्रिय आणि वैशिष्ट्यपूर्ण परंपरा आहे. नाट्यसंगीत जसे नाटकात गायले जाऊ लागले तसेच कालांतराने ते निरनिराळ्या मैफलींमधूनही सादर होऊ लागले. जेव्हा नाटकात एखादे नाट्यपद सादर होते तेव्हा त्याचा सौंदर्यपूर्ण आविष्कार गायक नटाला, रसिकांना आनंद देऊन जातो. तसेच जेव्हा मैफलींमधूनही एखादे नाट्यपद सादर होते तेव्हा त्याचा सौंदर्यपूर्ण आविष्कार गायक कलावंताला आणि श्रोत्यांना आनंद देऊन जातो.

## १.२ विषयनिवड

'नाट्यसंगीत' या विशिष्ट शैलीचा संगीत नाटक आणि मैफल या दोन्ही माध्यमांमधून आविष्कार होत आलेला आहे. नाटकातील भूमिका नकळत समरस होऊन करताना मला दिग्गज कलावंतांचा अभिनय, त्यांचे प्रत्यक्ष रंगभूमीवरील पदसादरीकरण जवळून पाहण्याची संधी लाभली. त्यातून सौभद्र, मानापमान, स्वयंवर, संशयकल्लोळ अशा निरनिराळ्या नाटकांमधे आलेल्या पदांचे सौंदर्यविशेष मला जाणवले. ती पदे त्या त्या प्रसंगाला अनुरूप अशा पद्धतीने नाटकात येतात. नाटकातील नाट्यपदे ही मैफलींमधूनही सादर होताना आढळतात. त्या पदांचे सौंदर्य त्या त्या गायक कलावंतांनुसार

नाविन्यपूर्णरितीने समोर येते असे मला प्रत्यक्ष अनुभवातून जाणवले. अशारितीने नाटक आणि मैफल या दोन्ही माध्यमातून नाट्यसंगीताचे सादरीकरण करत असताना त्यात फरक आहे असे माझ्या लक्षात आले. याचा अधिक विचार करत असताना नाटकात येणाऱ्या पदाचे प्रयोजन आणि मैफलीत येणाऱ्या पदाचे प्रयोजन हे वेगवेगळे असते असे आढळले. तसेच दोन्हींमधील त्याचे स्वरूपही भिन्न भिन्न असल्याचे दिसून आले. नाटकामध्ये गायल्या जाणाऱ्या नाट्यपदाची व्याप्ती आणि मैफलीमध्ये गायल्या जाणाऱ्या नाट्यपदाची व्याप्ती यातही फरक असल्याचे निदर्शनास आले. म्हणून दोन्ही माध्यमांमधून सादर होणाऱ्या नाट्यसंगीताच्या प्रस्तुतीकरणाची रीतसर मांडणी, त्यातील गायक नट, गायक, संगीतदिग्दर्शक या सर्वांचा प्रत्येक नाट्यपदामागील विचार जाणून घेणे याची उत्सुकता आणि त्यातून निर्माण होणारे कुतूहल या विषयाला कारणीभूत ठरले.

नाटकात नाट्यकथावस्तू आणि संगीतदिग्दर्शक या दोन्हींचे भान पद सादर करत असताना ठेवावे लागते आणि मैफलीत स्वतंत्र सांगीतिक विचार या दृष्टिकोनातून पद सादर केले जाते. या दोन्हींचा अभ्यास नाट्यरसिकांना आणि कलावंतांना उपयोगी होऊ शकेल असे वाटले. त्यामुळे हा विषय विस्तृतपणे मांडणे गरजेचे होते. एकच नाट्यपद नाटकात येते तेव्हा त्यामागील प्रसंग, पार्श्वभूमी, प्रसंगानुरूप असलेले रागाचे स्वरूप, शब्द व राग यांना अनुसरून निवडलेला ताल, प्रसंगाप्रमाणे आवश्यक असलेली गीताची लय या सगळ्यांचा विचार महत्त्वाचा ठरतो. हाच विचार मैफलीत असतोच असे नाही. मैफलीमध्ये बऱ्याच वेळेला गायकाच्या कलाप्रतिभेचा वेगळा आविष्कार बघायला मिळतो. कारण तेथे कथानक पुढे सरकवण्याचे बंधन नसते किंवा कलाकाराला सोबत अभिनय करायचा नसतो आणि रागशुद्धता याचा विचार शास्त्राच्यादृष्टीने अधिक प्रबल होतो की काय असे काहीवेळेला जाणवते. असे तीन-चार घटक बदलल्यामुळे एकच नाट्यपद दोन वेगळ्या पातळीवरील आनंद रसिकांना देत असते. तेव्हा या दोन वेगवेगळ्या

सादरीकरणातील कलाकारांची मनोभूमिका, उपलब्ध वेळ, त्यांचे सांगीतिक ज्ञान, त्यांची सर्जनशीलता हे घटक त्यात महत्त्वाचे ठरतात. या विषयावर संशोधन करण्याची गरज आहे असे वाटले. त्यामुळे ''मराठी नाट्यसंगीताचे नाटकातील आणि मैफलीतील प्रयोजन, स्वरूप, व्याप्ती या संदर्भांच्या अनुषंगाने तुलनात्मक विश्लेषण'' हा विषय संशोधनासाठी निवडला.

## १.३ समस्याकथन

मराठी नाट्यसंगीत ही गायनशैली मुळात संगीत नाटकात विकसित झाली आहे. संगीत नाटकात समाजात प्रचलित असणारे विविध गीतप्रकार वापरले गेले. जसे - हरदासी पदे, लावणी, दशावतार, कानडीगुजराथी चाली, रागदारी संगीत, ठुमरी-दादरा इ. या सर्व गीतप्रकारांच्या साहाय्याने नाट्यसंगीत नाटकात स्थिर झाले. वैशिष्ट्यपूर्ण, सौंदर्यपूर्ण ठरले आणि लोकप्रियही झाले. ही नाट्यपदांची लोकप्रियता इतकी वाढली की शास्त्रीय गायकांना आपल्या मैफलीत नाट्यपदे समाविष्ट करण्याचा मोह आवरता आला नाही. म्हणजे एका अर्थाने नाट्यगीतांचा प्रवास समाजातील प्रचलित गीतप्रकारांमधून (बाहेरून) नाटकाकडे आणि नाटकामधून मैफलीत (बाहेर) असा झाला. जेव्हा नाट्यसंगीत नाटकांमधून मैफलीत आले तेव्हा त्याच्या स्वरूपात व सादरीकरणात सौंदर्यात्मकदृष्ट्या वेगळेपण जाणवले. त्यात असलेले सौंदर्यात्मक वेगळेपण नक्की काय आहे हे पाहणे हा हेतू आहे. हीच प्रस्तुत प्रबंधाची खऱ्या अर्थाने समस्या आहे असे म्हणता येईल. विशेषत: आजच्या काळाचा विचार करत असताना नाटकात व मैफलीत सादर होणाऱ्या नाट्यसंगीताचे स्वरूप आणि सादरीकरण कसे असावे याचा विचार फार महत्त्वाचा ठरतो. केवळ संशोधनाद्वारेच या समस्येचे निराकरण शक्य आहे.

## १.४ प्रस्तुत विषयाचे महत्त्व

सव्वाशे-दीडशे वर्षांपूर्वीपासून चालत आलेली नाट्यसंगीताची शैली ही विशिष्ट

ढंगाने विकसित झाली आहे. तसेच ती नाटक व मैफल या दोन्हींमध्ये गाऊन सिद्धही झाली आहे. त्यामुळे या नाट्यगीताचे नाटकातील आणि मैफलीतील सौंदर्य अभ्यासणे आवश्यक आहे. विस्तृत वाचनाअंती हा महत्त्वाचा विषय कोणी हाताळल्याचे निदर्शनास आले नाही. या विषयामुळे भावी पिढीलाही नाटकात व मैफलीत नाट्यसंगीत सादर होण्याचे प्रयोजन आणि दोन्हींमधील त्याचे स्वरूप यासंबंधीची मार्गदर्शक तत्त्वे संशोधनाअंती उपलब्ध होण्याची शक्यता आहे. हेच प्रस्तुत विषयाचे उद्दिष्ट आहे.

नाटकात येणारी सर्वच पदे उदा. प्रासंगिक, अभिनयात्मक किंवा कीर्तनी शैलीची पदे मैफलीत आलेली दिसत नाहीत. तर अभंग, रागदारी संगीतावर आधारीत, ठुमरी-दादरा यांसारख्या उपशास्त्रीय प्रकारांशी साधर्म्य असणारी पदेच मैफलीत सादर झाली. त्याच नाट्यपदांचा संशोधनात्मक विचार, प्रयोजन, स्वरूप, व्याप्ती या संदर्भाच्या अनुषंगाने केला आहे.

## १.५ व्याप्ती आणि मर्यादा

कोणत्याही दोन गोष्टी जेव्हा एकत्रितपणे सिद्ध करायच्या असतात त्यावेळेस त्या दोन्ही गोष्टींचे मूळ स्वरूप काय आहे हे जाणून घेणे आवश्यक आहे हेच संशोधनाचे मूळ तत्त्व आहे. म्हणून संगीत नाटक आणि मैफल यांच्या मूळ स्वरूपाचा आढावा घेतला आहे.

नाट्यसंगीत हा गीतप्रकार काय आहे हे प्रथम स्पष्ट होण्यासाठी नाटकातील नाट्यसंगीताचा ऐतिहासिक आढावा आणि त्याचे नाटकातील स्वरूप याचा विस्तृत विचार सुरुवातीला केला आहे. त्यामध्ये नाटकात आलेली वैविध्यपूर्ण पदे कोणती याचे विवेचन आले आहे.

नाट्यसंगीताचे नाटकातील स्वरूप अभ्यासल्यानंतर मैफलीतील स्वरूपाविषयी

जाणून घेणे आवश्यक ठरते. शास्त्रीय संगीताच्या मैफलीत नाट्यसंगीताचा समावेश कसा झाला हे पाहण्यापूर्वी शास्त्रीय संगीताच्या मैफलींचे स्वरूप कसे घडत गेले, याचा थोडक्यात ऐतिहासिक परामर्श घेतला आहे. त्यानंतर मैफलीत नाट्यसंगीत प्रस्तुत करण्यामागची भूमिका स्पष्ट केली आहे. मैफलीत नाट्यसंगीताचा समावेश झाल्यानंतर त्याचे सादरीकरण कसे होते हे उपलब्ध ध्वनीमुद्रणाद्वारे स्पष्ट केले आहे. बहुतांशी शास्त्रीय संगीताच्या मैफलीत नाट्यसंगीताचे प्रस्तुतीकरण याचा विचार येथे विस्तृतपणे केला आहे.

नाटकात आणि मैफलीत समाविष्ट होणाऱ्या नाट्यसंगीताचे स्वरूप स्वतंत्ररित्या अभ्यासल्यानंतर या दोन्ही माध्यमातील त्याच्या आविष्कारातील वेगळेपण तौलनिकदृष्ट्या अभ्यासले. दोन्हीतील वेगवेगळा असणारा सौंदर्यात्मक दृष्टिकोन अभ्यासताना दोन्हीतील त्याचे प्रयोजन, स्वरूपविषयक विश्लेषण (जसे -प्राधान्य, पार्श्वभूमी, दृक्‌श्राव्य अंगे इ.) तसेच दोन्हींमधील प्रस्तुतीकरण - आकर्षक सुरुवात, लय, विस्तार, साथसंगत, (गायक, नट व गायक) यांच्या साहाय्याने विस्तृतरित्या अभ्यासले. नाटक व मैफल दोन्हींमधून नाट्यसंगीताला मिळालेली लोकप्रियता यांचाही विचार केलेला आहे.

नाट्यसंगीत हे केवळ शास्त्रीय संगीताच्या मैफलीतून सादर होते असे नसून केवळ नाट्यसंगीताच्या मैफलीही सादर होतात. सवेश नाट्यसंगीताचे कार्यक्रम, एखाद्या नाटकाचे कथानक घेऊन त्यातील पदे सादर करणे अशा स्वरूपाच्या आगळ्यावेगळ्या मैफलीही सादर होत असतात असे निरीक्षणाअंती आढळले. म्हणजेच नाटकाप्रमाणेच मैफलीतही नाट्यसंगीत प्रभावी ठरते.

वरील सर्व गोष्टींच्या अभ्यासातून नाटक व मैफल या दोन्ही माध्यमातून सादर होणाऱ्या नाट्यसंगीताचे सौंदर्यात्मक विश्लेषण प्रस्तुत प्रबंधात केले आहे.

•••